नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com

हिंगोली कृषी हवामान सल्ला

शुक्रवार दिनांक – ०३.०१.२०२०

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक ०३ जानेवारी ते ०८ जानेवारी २०२०)				
दिनांक	०४/०१	०५/०१	०६/०१	०७/०१	०८/०१
पाऊस (मिमी)	००.०	००.०	००.०	००.०	००.०
कमाल तापमान (अं.से.)	२९.०	२८.०	२७.०	२८.०	३०.०
किमान तापमान (अं.से.)	१६.०	१५.०	१३.०	१५.०	१७.०
ढग स्थिती (आकाश)	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	८३	७६	६१	५५	६०
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	५०	४६	३९	३७	४०
वा-याचा वेग (किमी / तास)	०८	१५	१२	०९	०७
वा-याची दिशा	ईशान्य	ईशान्य	पुर्व	पुर्व	आग्नेय

हवामानाचा इशारा	जिल्ह्यात पुढील पाच दिवसात आकाश स्वच्छ ते अंशत: ढगाळ राहील.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
हरभरा	वाढीची अवस्था	हरभरा पिकात घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ % ४.५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के ईसी २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाचा अंदाज घेऊन फवारणी करावी. हरभरा पिकावरील रोपे कुरतडणा-या अळीचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २० % २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून रोपालगत जमिनीवर पावसाचा अंदाज घेऊन फवारणी करावी.
गहु	वाढीची अवस्था	गहु पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी झायनेब किंवा मॅन्कोझेब (७५ डब्ल्युपी) २५ ग्रॅम प्रोपीकोनॅझोल २५ टक्के ईसी १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
ऊस	वाढीची अवस्था	हंगामी ऊस पिकाची लागवड १ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करता येते.
हळद	कंद वाढीची अवस्था	हळद पिकात पानावरील ठिपके रोगाच्या व्यवस्थापनासाठी मॅन्कोझेब (७५ डब्ल्युपी) २५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम (५० डब्ल्युपी) १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
संत्रा /मोसंबी	फळ वाढीची अवस्था	संत्रा / मोसंबी फळबागेत रोगाचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणुन १ टक्के बोरडो मिश्रणाची फवारणी करावी.
डाळिंब		मृगबहार धरलेल्या डाळिंब फळबागेतील काढणीस तयार असलेल्या फळांची काढणी करून घ्यावी. डाळिंब बागेत रोगाचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून रोगनाशकाची फवारणी करावी.
फुल शेती	कळया लागणे अवस्था	दर्जेदार मोगरा फुलपिकाच्या उत्पादनासाठी जानेवारी दरम्यान गरजेनुसार झाडांची छाटणी करावी.

भाजीपाला	फळवाढीची अवस्था	कोबीवर्गीय भाजीपाला पिकात रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून मॅन्कोझेब (७५ डब्ल्युपी) २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
चारा पिके	वाढीची अवस्था	रब्बी हंगामात लागवड केलेल्या चारा पिकातील तणनियंत्रण करावे.

सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.